**CCE PR**
**UN-REVISED**

ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD, MALLESWARAM, BANGALORE – 560 003**

ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಮಾರ್ಚ್/ಏಪ್ರಿಲ್, 2018

**S. S. L. C. EXAMINATION, MARCH/APRIL, 2018**

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

**MODEL ANSWERS**

ದಿನಾಂಕ : 23. 03. 2018 ] ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

Date : 23. 03. 2018 ] **Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125

[ Max. Marks : 125

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **विभाग - A** | |
| | **( गद्य पद्यांशावर आधारोत )** | |
| I. | एका वाक्यात उत्तरे लिहा : ( बरोबर उत्तरास एक मार्क द्या ) : 16 × 1 = 16 | |
| 1. | मुसळ सारखा हत्ती कोणाला वाटला ? | |
| | **उत्तर :** सोंड पाहणाऱ्या आंधळ्याला | 1 |
| 2. | हत्तीचा दृष्टांत स्वामीनी म्हाइंभटास कोठे सांगितला ? | |
| | **उत्तर :** डोमेग्राम | 1 |
| 3. | डॉ० आंबेडकर विद्येची पूजा किती तास करत ? | |
| | **उत्तर :** 24 तास | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 4. | चिं. वि. जोशींच्या मानसपुत्राची नांवे काय ? | |
| | **उत्तर :** चिमणराव व गुंडयाभाऊ | 1 |
| 5. | काकूनी सोवळ्याच्या गाठोडयात काय लपविले होते ? | |
| | **उत्तर :** लोण्याचा डबा | 1 |
| 6. | 'हकिकत' हा पाठ कोणत्या पुस्तकातून निवडला आहे ? | |
| | **उत्तर :** हकिकत | 1 |
| 7. | उत्तम कांबळे उडया मारत घरी केव्हा आले ? | |
| | **उत्तर :** 7 वीत पहिला आल्यानंतर | 1 |
| 8. | उत्तम कांबळेच्या आईचे नाव काय ? | |
| | **उत्तर :** इलंदा | 1 |
| 9. | कवि 'मुकुंदराज' कोणाचा जयजयकार करतात ? | |
| | **उत्तर :** श्री शंकराचा | 1 |
| 10. | रूक्मिणीच्या गुरुचे नाव काय ? | |
| | **उत्तर :** सुदेव | 1 |
| 11. | माहेर कशाप्रमाणे आहे ? | |
| | **उत्तर :** गोकुळाप्रमाणे | 1 |
| 12. | 'अनंतशक्ती परमेश्वरू'या पाठाचा वाङ्मय प्रकार कोणता ? | |
| | **उत्तर :** प्राचीन गद्य | 1 |
| 13. | जपानी स्त्री कशी आहे ? | |
| | **उत्तर :** जपानी स्त्री गोड, लाघवी, शालीन, हसरी | 1 |
| 14. | रूक्मिणी कोणत्या देशाची राजकन्या होती ? | |
| | **उत्तर :** विदर्भ देशाची | 1 |
| 15. | देशभक्तांचा धर्म कोणता ? | |
| | **उत्तर :** दास्य | 1 |
| 16. | चुलोतल्या लाकडाने कुठे जळावे ? | |
| | **उत्तर :** चुलीतच. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| II. | तीन-चार वाक्यातोल उत्तरे ( मुद्दे ) : 13 × 2 = 26 | |
| 17. | 'अपार वेदना व त्रास सोसून मी विद्यासंपादन केली.' संदर्भासह स्पष्ट करा. | |
| | **उत्तर :** | |
| | **पाठाचे नांव –** विद्यार्थ्यांनो जागृत व्हा. | |
| | **लेखक –** डॉ० बाबासाहेब आंबेडकर संदर्भ 1 | |
| | **स्पष्टीकरण –** 1938 साली पुणे येथील अस्पृश्य साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात म्हटले आहे. स्पष्टीकरण 1 | 2 |
| 18. | केशव मेश्रामच्या मित्राच्या घरी जेवणाचा कोणता बेत होता ? | |
| | **उत्तर :** | |
| | गरमगरम पदार्थ जेवणात होते. रटरटविलेले घट्ट पिठले, तळलेल्या भोपळी मिरच्या. ज्वारीची पापडेदार मुलायम भाकरी, बेसनच्या उंड्यावर अर्धा प्याला तापविलेले जवसाचे तेल ओतले होते. | 2 |
| 19. | गंगूबाईच्या गळयावर शस्त्रक्रिया का झाली ? त्याचा परिणाम काय झाला ? | |
| | **उत्तर :** | |
| | गाणे गाऊ लागल्या की घसा दुखे तरीही गाणे थाबवले नाही. डाक्टरानी टॉन्सिल्सचे ऑपरेशन करण्यास सांगितले. त्यामुळे मुळचा बारीक नाजूक आवाज जाऊन तो पुरुषी बनला. | 2 |
| 20. | संत ज्ञानेश्वरांचा परिचय लिहा. | |
| | **उत्तर :** | |
| | संत ज्ञानेश्वर ( 1275 - 1296 ) | |
| | ज्ञानश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी. महान तत्वज्ञ, संत कवी, नाथ संप्रदायी. भागवत ( वारकरी ) संप्रदायाचे संस्थापक. 18 व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. 21 व्या वर्षी संजीवन समाधी घेतली. | 2 |
| | साहित्य – अमृतानुभव, चांगदेव पासष्ठी, ज्ञानेश्वरी. ओवी काव्यप्रकार प्रसिद्धीस आणला. | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 21. | पाहुणे कोठून आले असे आई मुलाला सांगते ?<br>**उत्तर :**<br>कावळे, गिधाडे घारी जेथून येतात, डोंगळे, डास, घुंगुरटी जेथून येते. खोकला, ताप, दुखणी जेथून येतात तेथून येथे आले आहेत. आम्हाला छळण्यासाठी आले आहेत. | 2 |
| 22. | 'अवकाश कवटाळून सुद्धा तिचे हात रिकामे' असे का म्हटले आहे ?<br>**उत्तर :**<br>न संपणारे कष्ट, हालअपेष्टा ती सोसते. कणी कोंडा पाखडून सत्व उचलण्याची तिची जन्मजात सवय सोडत नाही हे सहन करताना आज ना उद्या आपले दुःख संपेल असा आशावाद ती बाळगते पण तिला ते मिळणे दुरापास्त असते. | 2 |
| 23. | डोळस मनुष्य आंधळ्याना काय म्हणाला ?<br>**उत्तर :**<br>डोळस मनुष्य आंधळ्याना म्हणाला, तो हत्ती नव्हे. ते तर सर्व हत्तीचे एक-एक अवयव आहेत. | 2 |
| 24. | विद्या महासागरासारखी आहे म्हणजे काय ?<br>**उत्तर :**<br>विद्येशिवाय माणसाला शांतता नाही आणि माणुसकिही नाही. म्हणून विद्या ही महासागरसारखी आहे. | 2 |
| 25. | बांबूच्या झाडाला फुले केव्हा येतात ?<br>**उत्तर :**<br>बांबूची झांड खूप खूप वर्ष बांबू देतात. ह्या बांबूच्या वनाचा नाश व्हायची वेळ येते तव्हा बांबूला फुलं येतात. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 26. | अण्णाने काय काय करावे असे आईस वाटे ?<br>**उत्तर :**<br>अण्णाने दारु सोडावी, रोज कामाला जावे, पैसे मिळवावेत, पैसे संसारासाठी वापरावेत, पोराना पैसे शिक्षणासाठी द्यावेत, घरं बांधावं, पोरांना कपडे द्यावेत असे आईस वाटे. | 2 |
| 27. | विरहिणी म्हणजे काय ?<br>**उत्तर :**<br>देवाच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन असणारी काव्यरचना. | 2 |
| 28. | पाहुण्यांचे वर्तन कसे आहे ?<br>**उत्तर :**<br>पाहुण्यानी घरात आल्याबरोबर, बाबांच्या डब्यातील असलेले पानांचे जुडगे मनसोक्त खात होते व विडया पळवत होते. | 2 |
| 29. | पृथ्वीला कशाचे भूषण वाटते ? का ?<br>**उत्तर :**<br>पृथ्वीला धुळीचेच भूषण आहे. कारण धूळ हेच पृथ्वीवरील अलंकार आहे. तिला धुळीनेच सौंदर्य प्राप्त होते. | 2 |
| III. | पाच-सहा वाक्यात उत्तरे ( मुद्देसहित ) : 10 × 3 = 30 | |
| 30. | वसईच्या किल्ल्यातील भेद जाणून घेण्यासाठी काणी-कोणी कसे प्रयत्न केले ?<br>**उत्तर :**<br>1) **खंडोजी माणकर :** गुराखी बनले, गुरे चारावयास नेत आणि किल्ल्यातील पहाणी करीत.<br>2) **अंजूरकर पंचकळसे :** जातीने सुतार होते. लोकांच्या घरी सुतारकाम करत टेहळणी करत.<br>3) **दुल्लबाजी मोरे :** सरदार होते. ते कासार बनले आणि बांगडया भरण्याच्या निमित्ताने हेरगिरी करत. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 31. | लेखकाने पावसाळ्याचा हिशेब कसा घातला आहे ?<br>**उत्तर :**<br>पावसाळा अदमासे चार महिने म्हणजे 120 दिवस. 60 दिवस पाऊस. त्यातील 30 दिवस रात्री पडतो. घरात किंवा कामाच्या ठिकाणी 15 दिवस गेले. राहिले 15 दिवस. जाता येता आडोशाला थांबू शकतो. 7 दिवस गेले. उरले 8 दिवस. आपण जायला आणि यायला पाऊस पडायला 4 वेळ प्रसंग चार महिन्यात फक्त चार वेळा छत्रीचा वापर होतो. | 3 |
| 32. | 'जपानी स्त्री' बद्दल थोडक्यात माहिती लिहा.<br>**उत्तर :**<br>जपानी स्त्री गोड, लाघवी, शालीन, हसरी. भाषेतन नसले तरी हसऱ्या डोळ्यानी स्वागत करते. सर्व क्षेत्रात काम करतात. ट्रॅम कंडक्टर, बस कंडक्टर, विक्रेत्या, वाढपी, लिफ्टमन, बूट पॉलिश, केस कापणे याही धंद्यात आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकिय क्षेत्रात ही आहेत. टोप घेणे कमी पणाचे मानतात. शालीनतेचे प्रतीक. | 3 |
| 33. | वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ? तिसरी वाटणी कोणी मागितली ?<br>**उत्तर :**<br>कधी शेतातली कामे खोळंबून राहात. कधी चूल बद पडत. घरात सारखी घुसफुस वाढत चालली होती. दोघे भाऊ एकमेकाकडे आखाड्यात उतरल्याप्रमाणे पाहत. 2<br>तिसरी वाटणी गणातात्यानी मागितली. 1 | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 34. | ढोंगी साधूचे वागणे कसे असते ?<br>**उत्तर :**<br>जटा राखणे, अंगाला राख ( भस्म ) फासतात. संसारात विरक्ती दाखवून मठाची उठाठव करतात. मनात भाव नसताना वरपांगी हरिनाम घेतात. गळ्यात तुळशीच्या, रूद्राक्षाच्या माळा घालून आपण मोठेपणाचा आव आणतात. शुद्धतेचे आचरण नसते. जपतपाचे सोंग करतात. होमात तीळ, तांदूळ, तूप जाळून भक्तीहीन होम करतात. दंड कमंडलू घेऊन लटके वागणे. | 3 |
| 35. | कृष्ण, कर्ण, सौभद्र यांचे दाखले स्पष्ट करा.<br>**उत्तर :**<br>**कृष्ण :** युद्धात गोंधळलेल्या अर्जुनाला युद्धास प्रवृत्त केले. भरकटलेल्या समाजाला समाज सेवकानी हेच कार्य केले.<br>**कर्ण :** रथाचे चक्र भूमीत फसले तरी शौर्याने परिस्थितीवर मात केली. तसे समाज सुधारक कठोण परिस्थितीला सामोरे जातात.<br>**सौभद्र :** अर्जून अन्यत्र युद्धात गुंतलेला असताना स्वजनासाठी चक्रव्यूह भेदून प्राण दिला. बलिदान देणारे समाज सेवक होय. | 3 |
| 36. | पृथ्वी सूर्याकडे प्रेमाची याचना कशी करत आहे ? तिची आजची अवस्था काय आहे ?<br>**उत्तर :**<br>पृथ्वी सूर्याच्या मागे प्रेमाची याचना करत युगेयुगे फिरत आहे असे किती काळ धावू ? किती वेळा प्रेमाची याचना करु ? असे म्हणत आहे.<br>चंद्र, केतू, मंगळ, धमकेतू, ध्रुव, तारे हे तिच्याकडे प्रेमाची याचना करतात पण तेजस्वी सूर्यापूढे हे सर्व क्षुद्र आहेत. धुळीचा कण म्हणून सूर्याच्या पायाजवळ राहण्याची तयारी आहे.<br>तारुण्य ओसरले आहे. नवतीतील उमाळे उरले नाहीत. तारुण्याची आग अंगात उरली नाही. निराश, हताश बनली आहे. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 37. | 'धरण' कवितेतील 'स्त्री' ची व्यथा लिहा.<br>**उत्तर :**<br>पहाटेच्यावेळी उठून असणारे थोडेसे धान्य दळते. दिवस वर आला की कामाला लागते. मुलासाठी तिचा जीव मागे घोटाळतो. ती त्याला पाटीखाली ठेऊन कामाला लागते. उन्हाच्या झळा सोसते. पाय भाजू नयेत म्हणून पायाला पाला बांधते. घोटभर पाण्यासाठी वणवण फिरते. तिच्या कष्टावर श्रीमंताची चैन चालते. | 3 |
| 38. | बेळगावि काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.<br>**उत्तर :**<br>बेळगावीला काँग्रेसचे अधिवेशन भरणार आणि त्यात त्या अधिवेशनाचे अध्यक्ष महात्मा गांधी होते. हे अधिवेशन 1924 मध्ये होते. त्यात स्वागत गीत गंगूबाई व त्यांच्या शाळेतील विद्यार्थिनी मिळून गाणार होत्या. व्यास- पीठावर गांधीजी, नेहरुजी, महम्मद अली जीना, गंगाधर देशपांडे अशी बडी बडी मंडळी बसलेली होती. गगूबाईच्या स्वागत गीताला गांधीजीनी शाबासकी दिली. | 3 |
| 39. | माहेरच्या वैभवाचे वर्णन कसे केले आहे ?<br>**उत्तर :**<br>माहेर म्हणजे गोकुळच होय. तिथ मामा असतात. तिथे पाहुणचार चांगला होतो. तिथे कोणत्याही गोष्टीचा नकार नसतो. माहेरात आंबराई आहे. नारळ, पोफळीच्या बागा आहे. माहेराच्या अंगणात झांडाची सावली असते. भावजया प्रेमळ असतात. माहेरचे अन्न गोड लागते. तेथील काटेसुद्धा टोचत नाहीत. ते मऊच असतात. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IV. | आठ-दहा वाक्यातोल उत्तरे : 5 × 4 = 20 | |
| 40. | 'हिरवे सांगाती' या पाठातील चाफा, बहावा, पपया व बांबू या झाडांविषयी माहिती द्या.<br>**उत्तर :**<br>**चाफा :** कुठलेही पान फांदी तोडली की पांढरा चीक येतो. म्हणून याला 'बडी माँ' म्हणतात. फूले आली की पाने गायब होतात. व पाने आली की फुल नसतात येथे पानाफुलाचा लपंडाव चालतो. 1<br>**बहावा :** लाल आणि चिनार केशरी रंगाची उधळण करतो. पहाडी भागात रंगीबेरंगी कपडे घालून कुठेतरी वरात चालल्याप्रमाणे वाटते. 1<br>**पपया :** तीन वेळा फळ दिल्यानंतर हे झाड मरते. 1<br>**बांबू :** बांबूच्या वनातून वारा वाहताना होणारा सोंय सोंय आवाज साई साई म्हटल्याप्रमाणे वाटतो. नाश होण्याच्यावेळी याला फुले येतात. 1 | 4 |
| 41. | सावित्रीबाईना शिकविताना आलेल्या अडचणी लिहा.<br>**उत्तर :**<br>शाळेत खिडक्या समोर माणसे राहात. घाण घाण शिव्या देत ओरडत असत. कुणी छेड काढत. कुणी बाजूने जायचा, कुणी थुंके बाजूने येऊन खाकरत. शेण गोळे मारत. एकदा तरी चारी बाज्ने त्यांना अडविले. हे शुद्र माजले असे त्याना म्हणत. अंगावर दगड मारत. घाण टाकत. | 4 |
| 42. | पहिल्या तृणपात्याचा सत्कार का व कसा केला ?<br>**उत्तर :**<br>अतिशय कठिण परिस्थितीला तोंड देत. पहिल्या तृणपात्याचा जन्म होतो. पृथ्वीच्या संहाराची स्थिती असताना ते जन्मते. ते मृत्यूंजय आहे. म्हणून त्याचा सत्कार केला.<br>पक्षानी स्वागतगीत, ढगानी लवून मूजरा, वाऱ्याने लालमाती रूपी गुलाल उधळला. दक्षिणोत्तर सर कोसळली. मातीचा सुवास अत्तराप्रमाणे दरवळला. अष्टदिशांनी अभिष्ट चिंतन केले. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 43. | काया मातीत कवितेतील निसर्ग वर्णन करा.<br><br>**उत्तर :**<br><br>ढग ढोल वाजवितो. वीज थयथय नाचते. शेतकरी तथा परिस्थितीत पत्नीबरोबर पेरणी करत असतो. मातीच्या वासान जीवाला भूल पडते. पडणाऱ्या पावसाच्या धारानी शेतकऱ्याला अभिषेक होतो. गहू, जोंधळा, सोन्या चांदीप्रमाणे लखाकतात. माती लोण्यासारखी वाटते. कपाशी चांदीसारखी चकाकते. | 4 |
| 44. | पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा.<br><br>हे सर्व पंथ ................................................<br>..............................................................<br>..............................................................<br>............................ वसू दे, दे वरचि असा दे ।।<br><br>**उत्तर :**<br><br>हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे<br>नांदोत सुखे गरीब अमोर एकमतानी<br>मग हिंदू असो, ख्रिश्चन वा हो इस्लामी<br>स्वातंत्र्य सुखा या सकलामाजी वसू दे, द वरचि असा दे ।। | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **विभाग - B** | |
| | **( व्याकरणावर आधारीत )** | |
| V. | योग्य पर्यायी उत्तरे ( बरोबर उत्तरास एक मार्क द्या ) : $10 \times 1 = 10$ | |
| 45. | 'सदानंद' ही प्रकारची संधी आहे. | |
| | **उत्तर :** (ब) व्यंजनसंधी | 1 |
| 46. | 'अष्टमी' विभक्तीचे हे प्रत्यय आहेत. | |
| | **उत्तर :** (क) नो | 1 |
| 47. | रिया आंबा खाते. या वाक्यात हा प्रयोग आहे. | |
| | **उत्तर :** (अ) कर्तरी | 1 |
| 48. | ''मधुरा शाळेला आली''. या वाक्यात हा काळ आहे. | |
| | **उत्तर :** (ड) पूर्ण वर्तमान काळ | 1 |
| 49. | कानामागून आली नि अशी झाली. | |
| | **उत्तर :** (अ) तिखट | 1 |
| 50. | 'तू खेळ पण अभ्यास कर.' हे या प्रकारचे वाक्य आहे. | |
| | **उत्तर :** (ड) मिश्र वाक्य | 1 |
| 51. | 'पापपुण्य' हा या प्रकारचा समास आहे. | |
| | **उत्तर :** (अ) वैकल्पिक द्वन्द्व | 1 |
| 52. | 'पाण्यात विहार करणारे' याला एक शब्द हा आहे. | |
| | **उत्तर :** (ब) जलचर | 1 |
| 53. | 'केदार आणि रिया वेगात मैदानावर धावले' यातील 'वर' या अधोरेखित शब्दाची जात ही आहे. | |
| | **उत्तर :** (अ) शब्दयोगी अव्यय | 1 |
| 54. | भारत चहा साखर कच्चे लोखंड नि अभ्रक निर्यात करतो. या वाक्यात स्वल्प विराम इतक्या वेळा वापरावा. | |
| | **उत्तर :** (ब) दोन. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VI. | तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द ( योग्य उत्तरास एक मार्क द्या ) : $4 \times 1 = 4$ | |
| 55. | सुख : दुःख : : स्वदेश : ............. | |
| | **उत्तर :** परदेश | 1 |
| 56. | मुलगा : मुलगी : : विधवा : ............. | |
| | **उत्तर :** विधूर | 1 |
| 57. | हरणाचा : कळप : : फुलांचा : ............. | |
| | **उत्तर :** गुच्छ | 1 |
| 58. | तूप : कन्नड : : समारोह : ............. | |
| | **उत्तर :** हिंदी. | 1 |
| VII. | सूचने प्रमाणे उत्तरे : $3 \times 2 = 6$ | |
| 59. | 'गंगेपरि पवित्र ठेवा मनी विचार'<br>अलंकार ओळखून लक्षण सांगा.<br>**उत्तर :**<br>**अलंकार –** उपमा — अलंकार ओळखणे 1<br>**व्याख्या –** उपमेय व उपमान यांची जेथे सारखीच तुलना केली जाते. व्याख्या 1 | 2 |
| 60. | 'मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढ मासी'<br>वरील ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.<br>**उत्तर :**<br>**वृत्त :**<br>मेघानी \| हे गग \| न भर \| तागाढ \| आषाढ \| मासी<br>– – – – \| – ∪ ∪ \| ∪ ∪ ∪ \| – – ∪ \| – – ∪ \| – –<br>म \| भ \| न \| त \| त \| ग ग<br>वृत्ताचे नाव – मंदाक्रान्ता — गणपाडून ओळखणे - 1<br>अक्षरे – 17 — वृत्ताचे नाव - 1<br>यति – 4, 6 व्या अक्षरावर | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 61. | पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.<br>i) आकाश पाताळ एक करणे<br>ii) गयावया करणे.<br>**उत्तर :**<br>वाक्प्रचाराचा अर्थ<br>(i) आकाश पाताळ एक करणे – खूप आरडाओरड करणे.<br>(ii) गयावया करणे – विनवणीकरणे, आर्जवे करणे.<br>अर्थ 1<br>वाक्यात उपयोग 1<br>( वाक्यात वाक्प्रचाराचा उपयोग व्हावा अर्थाचा नव्हे ) | 2 |
| | **विभाग - C**<br>**( लखन व रचनावर आधारीत )** | |
| VIII. 62. | कल्पनाविस्तार ( मुद्दे ) :<br>(i) जशास तसे<br>(ii) धीर धरी रे धीरापोटी असती मोठी फळे गोमटी.<br>**उत्तर :**<br>(i) दिलेल्या कल्पनेचा अर्थ ( शब्दशः ) 1<br>(ii) एखादा दाखला अथवा उदाहरणासह स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>(iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IX. 63. | पत्रलेखन : ( उत्तराचे मुद्दे ) $1 \times 5 = 5$<br>तुम्ही पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळाचे वर्णन करणारे मित्राला / मैत्रिणीला पत्र लिहा.<br>**किंवा**<br>आई / वडिलांना तुमच्या पुढील शिक्षणाबद्दल माहिती सांगणारे पत्र लिहा.<br>**उत्तर :**<br>(i) प्रेषक पत्ता 1<br>(ii) मायना 1<br>(iii) मजकूर भाषासौंदर्य 2<br>(iv) शेवट सही $\frac{1}{2}$<br>(v) कोणाला पत्र पाठवितात त्याचा पत्ता $\frac{1}{2}$ | 5 |
| X. 64. | निबंध : ( उत्तराचे मुद्दे ) $1 \times 5 = 5$<br>(i) लेक वाचवा.<br>(ii) राष्ट्रीय एकात्मता.<br>(iii) माझा आवडता संत. | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **उत्तर :**<br>(i) आकर्षक प्रारंभ 1<br>(ii) विषय ज्ञान 2<br>(iii) भाषा सौंदर्य 1<br>(iv) शेवट. 1 | 5 |